# प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना
# दावा फॉर्म

दायित्वाचा स्वीकार न करता हा फॉर्म देण्यात आला आहे आणि तो मिळाल्यापासून 7 दिवसांच्या आत भरून पाठविला गेला पाहिजे.

दावा क्र. ______________ पॉलिसी क्र. ______________

1) संपूर्ण नाव : ______________
पत्ता : ______________
संपर्क क्र. ______________

2) बँकेचे नाव आणि ______________
पत्ता ______________
बचत खाते क्र. ______________

3) ए) अपघात/मृत्यू केव्हा झाला? दिवस, दिनांक आणि वेळ सांगा. ______________
ब) कोठे घडला? (स्थान) ______________
सी) मृत्युचे कारण/झालेल्या दुखापतीची संपूर्ण माहिती द्या. ______________

4) उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नाव आणि पत्ता द्या. ______________

5) आवश्यक असल्यास कंपनीचे वैद्यकीय किंवा इतर अधिकारी तुम्हाला कोठे आणि केव्हा भेटू शकतात ते सांगा ______________

6) ए) मृत्युच्या प्रकरणात, मूळ एफआयआर/शवविच्छेदन अहवाल/मृत्युचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. ______________
ब) अपंगत्वाच्या प्रकरणामध्ये सिव्हिल सर्जनचे अपंगत्वाबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. ______________

मी याद्वारे घोषित करतो आणि वरील माहितीच्या सर्व बाबतीतील सत्यतेची हमी देतो आणि मी सहमत आहे की मी आता केलेली किंवा करीत असलेली विधाने चुकीची किंवा खोटी असल्यास, माहिती दाबून किंवा लपवून ठेवल्यास नुकसानभरपाई मिळवण्याचा माझा अधिकार संपूर्णपणे जप्त होईल.

दिनांकित :

स्वाक्षरी :
(दावाकर्ता)

# <u>प्रधान मंत्री सुरक्षा बीमा योजना (पीएमएसबीवाय)</u>

## <u>दावा प्रक्रिया</u>

1. या पॉलिसीअंतर्गत दावा उदभवू शकेल असा अपघात घडल्यानंतर विमाधारकाने किंवा त्याच्या नामितीने (विमाधारकाचा मृत्यू झाल्यास)या पॉलिसीसाठी ज्या बँक शाखेतील खात्यामधून विमा हप्ता आपोआप नामे केला होता त्यांच्याशी लगेच संपर्क करावा आणि विधिवत् संपूर्ण भरलेला दावा फार्म सादर करावा.

2. दावा फॉर्म वरील बँकेच्या शाखेतून किंवा विमा कंपनीच्या शाखा, रुग्णालये, सार्वजनिक आरोग्य केंद्रे, बँक मित्र किंवा विमा एजेंट आणि निर्धारित वेबसाइट सहित इतर निर्धारित ठिकाणी मिळवता येईल. संबंधित विमा दावा कंपन्यांनी अशा सर्व ठिकाणी मोठया प्रमाणात फॉर्म्स उपलब्ध करुन द्यावेत. मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीला असा फॉर्म पुरविण्यास नकार दिला जाऊ नये.

3. या पॉलिसी अंतर्गत दावा उदभवेल असा अपघात घडल्यापासून 30 दिवसांच्या आत विमाधारकाने किंवा त्याच्या नामितीने, जसे प्रकरण असेल त्या प्रमाणे, दावा फॉर्म संपूर्ण भरुन वरील बँकेच्या शाखेत सादर करावा.

4. विमाधारकाच्या मृत्यूच्या प्रकरणात दावा फॉर्म सोबत पुष्ट्यर्थ मूळ एफआयआर/पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल आणि मृत्यूचे प्रमाणपत्र आणि कायमच्या अपंगत्वाबाबतच्या प्रकरणात मूळ एफआयआर/पंचनामा आणि सिव्हिल सर्जन द्वारा दिले गेलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र असावे. सोबत जोडलेल्या नमून्यात दायित्व मुक्ततेच प्रमाणपत्र सुध्दा (डिसचार्ज सर्टिफिकेट) दावाकर्त्याकडून/नामितीकडून सादर केले जावे.

5. बँकेच्या अधिकृत अधिका-याने खाते/आपोआप नामे करण्याचे सदर विवरण तपासावे आणि खात्याची सविस्तर माहिती, नामिती, विमा हप्ता कापून घेतल्याची/ विमा कंपनीला भरल्याची खात्री करुन घ्यावी आणि दावा फॉर्ममध्ये दिलेल्या माहितीची अचूकता प्रमाणित करावी आणि दावा दाखल केल्यापासून 30 दिवसांच्या आत संबंधित विमा कंपनीला ते प्रकरण पाठवावे.

6. विमाकर्ता सत्य पडताळणी आणि खात्री करुन घेईल की त्या विमाधारकासाठीचा विमा हप्ता भरला गेलेला आहे आणि मास्टर पॉलिसी मधील विमाकृत व्यक्तींच्या यादीमध्ये त्या विमाधारकाचा समावेश केला गेला आहे.

7. बँकेसाठी सदर मास्टर पॉलिसी दिलेल्या विमा कंपनीकडून दाव्याची प्रक्रिया बँकेकडून मिळाल्यांनतर 30 दिवसांच्या आत पूर्ण करण्यात यावी.

8. जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे विमाधारकाच्या किंवा नामितीच्या बँक खात्यामध्ये देय दाव्याची रक्कम पाठविली जाईल.

9. एखाद्या विमाधारकाने त्याच्या /तिच्या नामितीचा निर्देश केला नसल्यास त्याच्या/तीच्या मृत्यूच्या प्रकरणात सक्षम कोर्ट / अधिका-याचे उत्तराधिकारी प्रमाणपत्र कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर विमाधारकाच्या कायदेशीर वारसांना स्वीकार्य दावा रक्कम दिली जावी.

10. विमा कंपनीकड़े विधिवत् भरलेला दावा फॉर्म सादर करण्यासाठी बँकेला जास्तीत जास्त तीस दिवसांची मुदत आहे आणि त्यानंतर विमा कंपनीला दावा मंजूर करण्यासाठी आणि पैसे अदा करण्यासाठी तीस दिवसांची कालमर्यादा आहे.